| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | ०६/०२/२०२४ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | ०६/०२/२०२४ |
| ३. | दोषारोप दाखल तारीख | ११/०३/२०२४ |
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | ११/०३/२०२४ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | २७/०७/२०२६ |
| ६. | निकालीसाठी राखीव ठेवल्याची तारीख | २७/०७/२०२६ |
| ७. | निकाल तारीख | २७/०७/२०२६ |
| ८. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | नाही. |
| ९. | कालावधी | ०२ व. ०४ म. १६ दि. |
| १०. | जप्त मुद्देमाल | रोख रक्कम रु.१९०/–, एक पेन, एक सट्टापट्टीचे आकडे लिहीलेला कागद |

| अ. क्र. | आरोपीचे नाव | आरोपी अटक तारीख | आरोपीस जामीन दिल्याची तारीख | गुन्हा | आरोपीस शिक्षा / निर्दोष मुक्तता | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विजय दादाजी जेंगठे | सुचनापत्र | –– | म.जु.का कलम १२–अ | निर्दोष | नाही | नाही. |

## न्यायनिर्णय

## (घोषीत दिनांक २७/०७/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीचे विरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १२ (अ) नुसार चालविण्यात आला.

## मुद्दे व निष्कर्ष

२) विद्वान विशेष सरकारी वकील श्री. सी. आर. भोई व आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. एस. पी. नाकतोडे यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले.

उभय पक्षाच्या युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुद्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ०६/०२/२०२४ रोजी सायंकाळी अंदाजे ०४.०० ते ०४.३० वाजताच्या दरम्यान मौजे गुंजेवाही, ता. सिंदेवाही येथे सार्वजनीक ठिकाणी, आरोपी हा लोकांकडुन पैसे घेऊन कागदावर सट्टापट्टीचे आकडे लिहुन हारजीतचा जुगाराचा खेळ स्वतःच्या फायद्यासाठी खेळतांना मिळुन आला व त्यायोगे त्याने महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १२ (अ) ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | : | नाही |
| २ | अंतीम आदेश काय ? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

३) अभियोगपक्षाने आरोपीं विरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या हेतुने साक्षीदार क्रमांक १ जप्ती पंच गजानन देवराव मडावी व साक्षीदार क्र. २ जप्ती पंच सोमेश्वर दादाजी तोडासे यांना तपासले. अभियोगपक्षाला प्रस्तुत प्रकरणातील उर्वरीत साक्षीदार तपासण्याची वारंवार संधी देण्यात आली होती. परंतु, अभियोगपक्षाने वारंवार संधी देऊन देखील प्रस्तुत प्रकरणातील उर्वरीत साक्षीदारांना तपासले नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी १ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला आहे.

४) आरोपीचे विरुध्द गुन्हयाच्या अनुषंगाने पुरावा न आल्यामुळे आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले नाही. त्याबाबतचा आदेश निशाणी १ वर पारित करण्यात आला आहे.

## मुद्दा क्रमांक ०१ करीता

५) सदर खटल्यातील साक्षीदार क्र. ०१ गजानन व साक्षीदार क्र. ०२ सोमेश्वर हे

घटनास्थळ वजा जप्ती पंच आहेत. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, दिनांक ०६/०२/२०२४ रोजी पोलीसांनी त्यांना पंच म्हणुन कुठेही बोलाविले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष काहीही कार्यवाही केली नव्हती. तसेच त्यांच्या समक्ष पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य केली. परंतु त्यातील मजकुर स्पष्टपणे नाकारला आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास सहाय्यक असे पटलावर काहीही आले नाही.

६) अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन करण्यात आले. साक्षीदार क्र. ०१ गजानन व साक्षीदार क्र. ०२ सोमेश्वर हे पंच तथा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. परंतु साक्षीदार क्र. ०१ व ०२ यांनी अभियोग पक्षाला अनुकुल असे काहीही कथन केले नाही. त्यामुळे साक्षीदार क्र. ०१ गजानन व साक्षीदार क्र. ०२ सोमेश्वर यांची साक्ष आरोपी विरुध्दचा गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षास उपयुक्त नाही.

७) अभियोग पक्षाचा साक्षीपुरावा पाहता असे दिसुन येते की, जप्तीपंच हे अभियोग पक्षास सहाय्य करीत नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने नोंदविलेला पुरावा आरोपीला शिक्षा करण्याच्या हेतुने पुरेसा व सबळ नाही. तसेच अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार व तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे आरोपी विरुध्द गुन्हा सिध्दीसाठी पुरावा अभिलेखावर प्राप्त नाही. यामुळे मी अशा निष्कर्षास येतो की, आरोपी विरुध्द लावण्यात आलेला दोषारोप अभियोगपक्षाने निःसंशयपणे सिध्द केला नाही. सबब, दिनांक ०६/०२/२०२४ रोजी सायंकाळी अंदाजे ०४.०० ते ०४.३० वाजताचे सुमारास मौजे गुंजेवाही, ता. सिंदेवाही येथे सार्वजनीक ठिकाणी, आरोपी हा लोकांकडुन पैसे घेऊन कागदावर सट्टापट्टीचे आकडे लिहुन हारजीतचा जुगाराचा खेळ स्वतःच्या फायद्यासाठी खेळतांना मिळुन आला ही बाब निःसंशयपणे सिध्द झाली नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ०२ करीता**

८) मुद्दा क्र. १ च्या विवेचनावरुन आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. संपुर्ण

संचिकेचे अवलोकनावरुन असे दिसुन येते की, पोलीसांनी सदर खटल्यात १९०/- (एकशे नव्वद रुपये) जप्त केले आहेत. आरोपीने सदर रकमेवर हक्क सांगितला नाही. म्हणुन सदर रक्कम आव्हान कालावधीनंतर सरकारजमा करणे न्यायोचीत होईल. तसेच संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, पोलीसांनी एक सट्टापट्टीचे आकडे लिहीलेला कागद जप्त केला होता व तो संचीकेसह दाखल केला आहे. तर जप्त बॉलपेन ही मुल्यहिन असल्यामुळे आव्हान कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी. आरोपीने नि.क्र.१२ वर निदर्शीका दाखल करुन त्याने पुर्वी दिलेली जमानत कायम ठेवण्याचे कथन केले आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोपी हा निर्दोष सुटण्यास पात्र असल्यामुळे त्याने पुर्वी दिलेली जमानत फौ.प्र.सं.कलम ४३७ (अ) प्रमाणे कायम ठेवणे न्यायोचीत ठरेल. सबब, मुद्दा क्रमांक ०२ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) आरोपी नामे विजय दादाजी जेंगठे यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) च्या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) ठाणेदार, पो. ठा. सिंदेवाही यांना निदेर्शीत करण्यात येते की, आव्हान कालावधी संपुष्टात आल्यानंतर पोलीस ठाणे अंतर्गत दाखल माल न.१०/२०२३ मधील जप्त करण्यात आलेली रक्कम रुपये १९०/- (एकशे नव्वद रुपये फक्त) सरकार जमा करण्यात यावी.

३) ठाणेदार, पो. ठा. सिंदेवाही यांना निदेर्शीत करण्यात येते की, आव्हान कालावधीनंतर पोलीस ठाणे अंतर्गत दाखल माल न. १०/२०२३ मधील जप्त एक बॉलपेन ही मुल्यहिन असल्यामुळे नष्ट करण्यात यावेत.

४) आरोपीने पुर्वी दाखल केलेले वैयक्तीक बधंपत्रे व जमानतदारांचे बंधपत्रे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ च्या पुर्ततेकरीता आव्हान कालावधीपर्यंत कायम

करण्यात येतात. सदर बंधपत्रे यापुढे सहा महिण्यापर्यंत कायम राहुन त्यानंतर रद्द समजण्यात येतील.

५) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

PANDURANG ANKUSH GHOTE

Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.07.27 15:53:38 +0530

दिनांक :- २७/०७/२०२६.

स्थळ :- सिंदेवाही.

**(श्री. पा. अ. घोटे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

सिंदेवाही, जि. चंद्रपुर.